सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

(संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)
कालमर्यादित : दिनांक : २१ जुलै, २०२३
क्रमांक : १०/एनडीएम/Intake Approval/DSD/२०२३/ ५८५ दिनांक : 19 JUL 2023

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,

**विषय:** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेशासाठी (CAP) अभ्यासक्रमनिहाय संस्थांची माहिती पडताळणी करुन उपलब्ध जागांची निश्चिती करणेबाबत......

**संदर्भ:** या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एडीएम/ विद्यार्थी संस्था बदल/२०२३/५०९, दिनांक : २६.६.२०२३.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेशासाठी (CAP) प्रवेशासाठीचे संपुर्ण वेळापत्रक घोषित करण्यात आलेले आहे. त्यानुसार लवकरच प्रवेश फेऱ्यांची सुरुवात होणार आहे. याकरीता संस्थेची अभ्यासक्रमनिहाय उपलब्ध जागा व अनुषंगिक माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता, शासन मान्यता तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची संलग्नता या कागदपत्राच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ज्या संस्थांच्या समावेश प्रथमवर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात आला होता, अशा संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेशासाठी (CAP) प्रवेशासाठी प्रथम वर्षात रिक्त राहिलेल्या जागा व प्रथम वर्षाकरीता मान्य असलेल्या प्रवेशक्षमतेच्या १० टक्के जागांची गणना करुन प्रवेशासाठी उपलब्ध जागांची निश्चित करण्यात येते. पुढे असेही नमूद करण्यात येते की, संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी पदविका संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल तसेच संस्था बदल करण्याबाबतची कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

तरी, सदर माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता सदर माहिती संबंधित संस्थांनी **दि. २० जुलै, २०२३** पर्यंत संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करावी. उपलब्ध जागा व अनुषंगिक माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास तसेच माहिती दि. २० जुलै, २०२३ पर्यंत अद्ययावत न केल्यास व पर्यायाने प्रवेश प्रकियेमध्ये काही अडचण उभ्दवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे — त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व

अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर <u>दि. २१ जुलै, २०२३</u> पर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

३. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.